• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३३७ • शनिवार, दि. ९ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 337 • Saturday 9 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## पुणे जिल्ह्यात १६ हजार कोटींची गुंतवणूक

पुणे – उद्योग संचालनालयातर्फे आयोजित जिल्हास्तरीय औद्योगिक गुंतवणूक परिषदेत पुणे जिल्ह्यात तब्बल १६ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून त्यातून सुमारे २९ हजार रोजगार निर्माण होणार आहेत. येत्या दोन वर्षांत ही गुंतवणूक होणार आहे. जिल्हा उद्योग केंद्रातर्फे मराठा चेंबर येथे या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, चेंबरचे महासंचालक प्रशांत गिरबाने उपस्थित होते. यावेळी 'एनझेडयूआरआय' पुणे नॉलेज पार्क प्रायव्हेट लिमिटेड आणि जीव्हीएस एअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांसह विविध क्षेत्रांमध्ये प्रस्तावित गुंतवणुकीसाठी ७२ गुंतवणूकदार आणि जिल्हा उद्योग केंद्र पुणे यांच्यात सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. त्यानुसार १६ हजार ५८१ कोटींची गुंतवणूक होणार असून, यामुळे २९ हजार १३ रोजगार निर्माण होणार आहेत. पुलकुंडवार यांनी उद्योजकांना पाठिंबा देण्यासाठी आणि या प्रदेशातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तर दिवसे यांनी जिल्हा विकासासाठी विविध विभागांमध्ये सहकार्य वाढविण्यासाठी जिल्हा धोरण आराखड्याचे महत्त्व विशद केले.

## नितीन गडकरी मविआत आले तर स्वागतच



मुंबई – माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी बरोबरीचे नेते आहेत. त्यांच्यामध्ये काय चर्चा झाली? मला ते माहीत नाही. पण नितीन गडकरी महाविकास आघाडीमध्ये आले, तर त्यांचे स्वागतच आहे, असे कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. एकंदरीत गडकरींचे नाव भाजपच्या पहिल्या यादीत नसल्याने राजकीय वातावरण तापले आहे. आधी सिलिंडर दर वाढविले, आता कमी केले, ही बनियागिरी आहे. दोन दिवसांपूर्वी गॅसचे दर वाढवले आणि दुकानात जसा सेल लागतो, तसा हा सेल आहे. गेल्या दहा वर्षांपासून महिलांच्या आणि त्यांच्या मुलाबाळांच्या तोंडातला घास काढण्याचे काम केंद्र सरकारने केले आहे. त्यामुळे याला काही नाविन्यपूर्ण म्हणता येणार नाही, असेही पटोले म्हणाले.

## कॉंग्रेसची लोकसभेची पहिली यादी जाहीर

मुंबई – लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. भाजप पाठोपाठ कॉंग्रेसनेही आपल्या ३९ उमेदवारांची यादी घोषित केली आहे. यामध्ये कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांना पुन्हा एकदा केरळच्या वायनाडमधून उमेदवारी देण्यात आली आहे. पहिल्या यादीत छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्यासह पक्षाच्या काही प्रमुख नेत्यांची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. ३९ पैकी १५ उमेदवार खुल्या प्रवर्गातील तर २४ उमेदवार अनुसूचित जाती अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक आणि ओबीसी प्रवर्गातून देण्यात आले आहेत. १२ उमेदवारांचे वय ५० वर्षांपेक्षा कमी आहे. कॉंग्रेस पक्ष मुख्यालयात कॉंग्रेसचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, कोषाध्यक्ष माकन आणि प्रवक्ते पवन खेडा यांनी पत्रकार परिषद घेतली आणि उमेदवारांच्या नावाची घोषणा केली.

## राज्यभरात लोकसभा निवडणुकीत अनेक विद्यमान खासदारांना डच्चू

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपने केलेल्या सर्व्हेत राज्यातील डझनभर विद्यमान खासदारांचा पत्ता कट करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामध्ये नांदेडचे भाजपचे विद्यमान खासदार प्रतापराव चिखलीकर यांचा देखील समावेश आहे. त्याला कारणही तितकचं मोठं आहे. अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर चिखलीकरांसमोर धोक्याची घंटा आलीय. याची चर्चा राजकारणात सध्या सुरू झाली आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघात भाजपच्या उमेदवारीसाठी डॉ. मीनल पाटील खतगावकर यांचे नाव अचानक समोर आल्यानंतर पक्षातील अन्य इच्छुकांमध्ये अस्वस्थता परसली आहे. विशेष:त विद्यमान खासदार प्रतावराव चिखलीकर यांना पुन्हा उमेदवारी मिळणार का ? याविषयी संभ्रम निर्माण झाला आहे. अलिकडेच अमित शाह यांची खतगावकर यांनी भेट घेतली होती. त्यामुळे चर्चांना अधिक बळ मिळालं आहे.

# मोदी सरकारमुळे देशावर कर्जाचा डोंगर

**मुंबई । वृत्तसेवा**

सध्याचे सरकार डाकूंचे सरकार आहे. देशावर कर्ज १०० रुपयांपैकी २४ रुपयांचे होते. या डाकू सरकारने हे कर्ज ८४ रुपयांवर नेले. २०१४ ते २०२४ या कालावधीत २४ रुपयावरुन ८४ रुपयांवरती नेले. जागतिक बँकेने भारताला इशारा दिलाय. आपला पगार समजा १० हजार आहे आणि बँकेचा १० हजारांचा हफ्ता असेल तर आपली चूल कशी पेटणार ? आपली चूल देखील पेटू शकणार नाही. पुन्हा सत्तेत आणले तर दरवर्षी कर्ज वाढत राहणार आहे. सध्या देशावर ८४ रुपयांचे कर्ज आहे. हे २०२६ ला १०० रुपयांचे कर्ज करतील. देशावर कर्ज उभा करुन मी सन्यास घेतो असे सांगतील. देशाला बुडवून हे सन्यास घेतील. देशाला बुडवणाऱ्या व्यक्तीला पुन्हा पंतप्रधान म्हणून संधी द्यायची का? मोदींच्या सरकारने इथल्या एअरफोर्सची वाट लावली. मनमोहन सिंगांच्या काळात १३५ विमाने फ्रांसकडून विकत घ्यायची होती. सनातन वाल्यांनो किती राफेल आले सांगा आणि किती विकत घ्यायचे होते तेही सांगा. केवळ ३५ विमाने आली. उरलेले १०० विमानं कधी येणार आहेत? ज्यांनी या देशाची संरक्षणाशी खेळलय. त्यांना पुन्हा पंतप्रधान करता कामा नये हे लक्षात घ्या. निवृत्त सैनिकांना माझं आव्हान आहे. सामान्य माणसाला लष्करातील कॉनवेची माहिती द्या. मी त्यांना आवाहन करतो, लष्करात असताना किती गाड्यांचा ताफा असतो आणि तेवढ्याच गाड्या का ठेवतात? याची माहिती सर्वसामान्य माणसाला द्या. पुलवामामध्ये त्यांनी तसं का केलं नाही, हे विचारा. मोदींना आम्ही विचारतो की, ८० गाड्यांचा ताफा कसा झाला. ज्या मेजरने ८० गाड्यांचा ताफा केला. त्याची चौकशी करा. एका बाजूला देशाला बुडवणारा पंतप्रधान आणि दुसऱ्या बाजूने धारकऱ्यांच्या माध्यमातून दंगली पेटवल्या जात आहेत. सर्व दंगली धारकऱ्यांकडून घडवल्या जात आहेत, असा माझा आरोप आहे. एकदा आपल्याकडे पैसा राहिला नाही तर एकवेळ अशी येईल की, घरदार विकायची वेळ येईल. मोदी सरकारच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

## संभाजीनगरचा नवीन विकास आराखडा

**संभाजीनगर । वृत्तसेवा**

मागील अनेक वर्षांपासून रखडलेला शहराचा विकास आराखडा गुरुवारी सायंकाळी प्रसिद्ध करण्यात आला. महापालिकेच्या नगररचना विभागात आराखडा बघण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. त्यापूर्वीच सोशल मीडियावर आराखडा प्रसिद्ध झाला होता. आराखड्यात एकूण ६६८ आरक्षणे टाकण्यात आली आहेत. २०४७ पर्यंतची लोकसंख्या, मनपा हद्दीतील भूवापर लक्षात ठेवून आराखड्यात अनेक सोयी सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. नगरपरिषद, महापालिका अस्तित्वात आल्यानंतर जुन्या शहराचा विकास आराखडा तयार केला. त्यानंतर वाढीव हद्दीसाठी वेगळा विकास आराखडा अंमलात आला. शहर जसे जसे वाढू लागले, आसपासचे १८ खेडी, सिडको-हडको, सातारा-देवळाईचा मनपा हद्दीत समावेश करण्यात आला. राज्य शासनाने शहराचा जुना आणि नवीन विकास आराखडा एकत्र तयार करावा. त्यात वाढीव हद्दीचा समावेश करावा, असे आदेश दिले. त्यानुसार मनपात डीपी युनिट शासनाने स्थापन केले. रजा खान यांच्या नेतृत्वाखालील पथकाने जमीन वापर नकाशा तयार केला. त्यानंतर खंडपीठाच्या आदेशानुसार शासनाने बृहनमुंबई महापालिकेचे उपसंचालक श्रीकांत देशमुख यांची नेमणूक केली. मागील काही महिन्यात देशमुख यांनी विकास आराखडा तयार केला. प्रशासक जी. श्रीकांत यांना बुधवारी आराखडा सादर केला. गुरुवारी सायंकाळी नगररचना विभागात आराखडा नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध करून दिला.

## भाजप सोडून द्या -ठाकरे

**मुंबई । वृत्तसेवा**



नितीन गडकरी जी भाजप सोडून महाविकास आघाडीत या, तुम्हाला खासदार करतो, अशी खुली ऑफर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय मंत्री तथा भाजप नेते नितीन गडकरी यांना दिली आहे. भाजपकडून लोकसभा उमेदवारीची पहिली यादी जाहीर करण्यात आली असून, ज्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नाव नसल्याने चर्चेला उधाण आले आहेत. यावरूनच उद्धव ठाकरे यांनी गडकरी यांना भाजप सोडून महाविकास आघाडीत सहभागी होण्याची ऑफर दिली आहे. सोबतच महाविकास आघाडीमधून खासदार करण्याचे आश्वासन देखील ठाकरेंनी दिले आहे. दिल्लीपुढे झुकू नका, दिल्लीच्या अहंकाराला लाथ मारा. महाविकास आघाडीत या, तुम्हाला निवडून आणण्याची जबाबदारी आमची अशी खुली ऑफर उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना दिली आहे. उद्धव ठाकरेंची सभा झाली तेव्हा ते बोलत होते.

## त्या मुख्य अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करा-आदित्य ठाकरे


**मुंबई । वृत्तसेवा**



मुंबई महानगरपालिका आणि भारतीय रेल्वेने केलेली गोखले पुलाची पुनर्बांधणी ही देशाला लाजवेल अशी गोष्ट आहे. यंत्रणांच्या या अपयशाची बातमी जगभरात पसरली आहे. परंतु यंत्रणा दोषारोपाच्या खेळात मग्न झाल्या आहेत. या प्रकल्पातील मुख्य दायित्व असलेले महापालिका आयुक्त चहल आणि रेल्वेच्या समकक्ष अधिकाऱ्यांच्या निलंबणाचे आदेश जारी करावेत. अशी मागणी शिवसेना युवा नेते आदित्य ठाकरे यांनी राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. या प्रकल्पात हस्तक्षेप करून गडबड करता येणार नाही आणि निर्लज्जपणे करदात्यांच्या कोट्यावधी रूपयांची उधळपट्टी केल्याबद्दल निष्पक्ष चौकशीला सामोरे जाता येईल. मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांची बदली तर बऱ्याच काळापासून रखडलेली आहे आणि निवडणूक आयोगाच्या आदेशानंतरही घटनाबाह्य मुख्यमंत्री निवडणुक आयोगाला गृहीत धरत आयुक्तांची बदली करणे टाळत असल्याचाही उल्लेख आदित्य ठाकरे यांनी राज्यपालांना पाठवलेल्या पत्रात केलं आहे. दरम्यान गोखले पुल हे राजकारणी-अधिकारी-कंत्राटदार यांच्या सगंनमताचे ढळढळीत उदाहरण आहे. ज्याठिकाणी स्थानिक आमदारांनी अधिकाऱ्यांसह पुलाला अनेकदा भेट दिली. या भेटींमधअये त्यांना दोष दिसला नाही का ? की मुद्दाम हा दोष निर्माण करण्यात आला होता. जेणेकरून आता दुसरा पुल तोडून पुन्हा बांधता येईल ? या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी अपेक्षित आहे आणि त्यामुळे चौकशीला सामोरे जाण्यासाठी आयुक्त रेल्वेसाठी संबंधित मुख्य अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित केलेच पाहिजे असेही आदित्य ठाकरे यांनी सांगितले आहे.

## कॉंग्रेस लोकसभेच्या ३०० जागा लढवणार

**मुंबई । वृत्तसेवा**



लोकसभा २०२४ निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. जागावाटपावरून राजकीय पक्षांमध्ये खलबंत सुरू आहेत. कॉंग्रेस आपल्या उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर होण्याची शक्यता आहे. कॉंग्रेस लोकसभेच्या ५४३ जागांपैकी ३०० जागा लढवणार असल्याची माहिती समोर येत आहे. कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची गुरुवारी (ता. ७) दिल्लीत बैठक पार पडली. या बैठकीला पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी अध्यक्षा सोनिया गांधी, निवडणूक समितीतील अनेक नेते, प्रभारी उपस्थित होते. त्याचबरोबर बैठकीत संबंधित राज्यांमधील वरिष्ठ नेत्यांची देखील उपस्थिती होती. कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सीईसी बैठकीत ११ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण ६० लोकसभा जागांवर चर्चा झाली. यापैकी ४० उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आलंय. यामध्ये दिल्ली, कर्नाटक, केरळ, छत्तीसगड, तेलंगणा, सिक्कीम, त्रिपुरा, नागालँड, मणिपूर, मेघालय आणि लक्षद्वीपच्या लोकसभेच्या जागांचा समावेश आहे. महाष्ट्रात कॉंग्रेसने २०१९ मध्ये २५ जागा लढवल्या होत्या. मात्र कॉंग्रेसला फक्त एक जागा मिळाली होती. यावेळी कॉंग्रेस १५ जागांवर लढू शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# केज मतदार संघासाठी एक कोटींचा निधी -आ.नमिता मुंदडा



**केज । प्रतिनिधी**

आ.नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यानंतर राज्य शासनाने केज विधानसभा मतदार संघात वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत ९९ लाख ९९ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून १३ गावात विकासकामे होणार असल्याची माहिती आ. मुंदडा यांनी दिली. आ. नमिता मुंदडा यांनी त्यांच्या पहिल्या टर्ममधेच मतदार संघाच्या चौफेर विकासावर भर दिला आहे. शहरांपासून ते अनेक छोटी खेडे, वाड्या वस्त्यावर विकासकामे वेगाने सुरु आहेत. तर, उर्वरित ठिकाणची अनेक कामे प्रस्तावित आहेत. मतदार संघातील तांडे, वस्त्यावर पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आ. मुंदडा प्रयत्नशील आहेत. याच अनुषंगाने आ. मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने केज विधानसभा मतदार संघात वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत ९९ लाख ९९ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून १३ तांडा वस्त्यांवर सिमेंट रस्ते आणि नाल्यांची कामे होणार आहेत. भविष्यात इतर तांडे, वस्त्यांच्या कामासाठी देखील पाठपुरावा सुरु असल्याचे आ. मुंदडा यांनी सांगितले. केज तालुका : कोल्हेवाडी आघाव वस्ती (रस्ता), सारूळ विठ्ठल वस्ती (रस्ता), लिंबाची वाडी काकडवस्ती (रस्ता), डोका भांगेवस्ती (रस्ता), अरणगाव भांगेवस्ती (रस्ता) अंबाजोगाई तालुका : येल्डा कोल्हेवाडी वस्ती (रस्ता), दगडवाडी सुरनर वस्ती (रस्ता), केंद्रेवाडी बाबू अण्णा वस्ती (रस्ता), मांडवा पठाण मैदरी तांडा (रस्ता व नाली), मांडवा पठाण गोदनपाट तांडा (रस्ता व नाली) बीड तालुका : खंडेवाडी डोळेवस्ती (रस्ता), येलंबघाट चादरवस्ती (रस्ता), सानपवाडी वैतालवाडी सोपेटवाडी सानपवस्ती क्र.२ (रस्ता).

## संपादकीय

# महिला दिन

केवळ कायदा आला म्हणजे प्रश्न सुटले असे होत नाही. कायद्यांचा आधार घेऊन प्रत्यक्ष पीडित महिलेला न्याय मिळण्यापर्यंतची प्रक्रिया महिलांसाठी अनुकूल आहे का, संवेदनशील, अनुभवी, लिंगभेदविरहित आहे का, याचा विचार केला गेला पाहिजे. ती तशी नसेल तर कायदे हे कागदावरच राहतील. त्यांचा आधार घेऊन महिलांना न्याय मिळू शकणार नाही. ८ मार्च हा जागतिक महिला दिन. त्यानिमित्ताने. आपल्याकडे महिलांचे प्रश्न हे पूर्वीपासूनच दुर्लक्षित राहिलेले आहेत. त्यांना कधीही प्राधान्य दिले नाही. कालौघात जसजशा घटना घडत गेल्या, त्या घटनांनुरूप किंवा त्या घटनांना प्रतिसाद देण्यासाठी म्हणून काही कायद्यांमध्ये बदल केले. बदलत्या काळातील महिलांच्या प्रश्नांसंदर्भात काही धोरण ठरवण्यासाठी वा कायदा करण्यासाठी म्हणून हे बदल केले गेले नाहीत. थोडक्यात, त्यामागे खूप दूरदृष्टी होती अथवा महिलांचा विचार होता असे नाही. महिलांचे हक्क हे मानवी हक्क आहेत, हे सिद्ध करण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी एक काळ ओलांडावा लागला. ७५ नंतरचे दशक हे आंतरराष्ट्रीय पातळीवरही 'महिलांचे दशक' मानले गेले. त्यादरम्यान अनेक परिषदा झाल्या, काही घडामोडी घडल्या. जागतिक स्तरावर आणि भारतीय स्तरावर घडणार्या या घटना समजून घेणे आवश्यक आहे. १९७९ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर 'सिडॉ'चा करारनामा (कन्व्हेन्शन टू एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्मस् ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेन्स्ट वूमेन) झाला. यानुसार महिलांवर होणार्या भेदभावाच्या प्रत्येक गोष्टी आपण दूर करू शकलो पाहिजे, असे उद्दिष्ट ठेवले गेले. १९८३ मध्ये भारताने त्याचा स्वीकार केला. त्यानंतरच भारतामध्ये खर्या अर्थाने महिलांसंदर्भातील कायदे झाले. '४९८ अ'चा कायदा आणि '३०४ ब'चा कायदा हा १९८३ मध्ये झालेल्या दुरुस्तीने आपण आणलेला आहे. त्यामागची कारणे काय होती? तर सत्तरीच्या दशकामध्ये नवीन लग्न झालेल्या महिलांच्या मृत्यूचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर वाढले असल्याचे लक्षात यायला लागले. यामागे हुंडाबळी आणि शारीरिक व मानसिक छळ ही दोन प्रमुख कारणे असल्याचे दिसून आले. अशा घटनांमध्ये पीडित महिलेचा मृत्यू झाल्यानंतर संबंधितांवर खुनाचा खटला चालवण्याऐवजी अशा प्रकारे मानसिक छळ करणे वा हुंड्यासाठी त्रास देणे ही हिंसा आहे, असे मानून खटला चालवला जावा. ही हिंसा जर समोर आली तर मृत्यू टाळता येतील, असा विचार पुढे आला. या विचारातूनच किंवा असे मृत्यू टाळण्याच्या उद्देशानेच '४९८– अ'ची निर्मिती झाली. पूर्वी कौटुंबिक हिंसाचार हे चार भिंतींच्या आतमध्ये होत असत, त्यामुळे बोलले जात नव्हते किंवा बोलले जाऊ नये, असे मानले जात होते; पण या कायद्यामुळे हे गृहितक बदलले आणि हा केवळ चार भिंतींच्या आतमध्ये घडणारा प्रकार नसून, तो एक सामाजिक प्रश्न आहे आणि सर्वांनी चर्चा करून तो थांबवला पाहिजे, असे ठरवले. अशाच प्रकारे विवाहानंतर ७ वर्षांच्या आत जर विवाहित महिलेचा अनैसर्गिक आणि संशयास्पद मृत्यू झाला, तर तो हुंड्यासाठी झाला आहे हे गृहीत धरले पाहिजे, असे '३०४ ब'नुसार ठरवले गेले. हे दोन्ही कायदे साधारणपणे एकाच कालावधीत आल्यामुळे या दोन्हींमध्ये एक गफलतही होऊ लागली. म्हणजे, '४९८ अ' हे केवळ हुंडा मागितला तरच लागू होते, असा कुठेतरी एक समज झाला होता; पण त्यापलीकडेही विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो आणि त्यासाठी हा कायदा आहे, हे हळूहळू लक्षात आले. असे असले तरी या कायद्यामागची भावना समजून न घेता संकुचित विचार ठेवून या कायद्यांचा अर्थ लावला जातो. दुर्दैवाने, आज महिला तितक्या संघटित नसल्यामुळे त्यांचा आवाज समाजापर्यंत जोरकसपणे पोहोचू शकत नाही. याउलट यासंदर्भात पुरुषांचे संघटन अधिक व्यापक आहे. त्यांच्या हातात आर्थिक नाड्या आहेत. माध्यमांसमोर ते सातत्याने त्यांचे प्रश्न मांडत असतात. त्यातून एकांगी बाजू समाजासमोर येत आहे. आज महिलांचे प्रश्न समजून घेण्यासाठी अधिकारकेंद्री दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. तसेच त्यांच्या समस्या जाणून घेताना 'बिटविन द लाईन्स' समजून घेण्यासाठी संवेदनशीलता असणे गरजेचे आहे. त्यासाठी एम्पथी म्हणजे सहानुभूती असणे आवश्यक आहे. ती नसल्यामुळे किंवा अतिशय कमी प्रमाणात असल्यामुळे कायदे करूनही वर्षानुवर्षे महिलांच्या समस्या प्रलंबित राहिलेल्या आहेत. बलात्काराच्या प्रकरणामध्ये, कामाच्या ठिकाणी होणार्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणांमध्ये हाच प्रकार दिसून येतो. त्यामुळे खर्या अर्थाने समानता आणायची असेल तर पितृप्रधान अथवा मातृप्रधान अशी संस्कृती न आणता समतेच्या दिशेने जाणारा समाज निर्माण होणे गरजेचे आहे. घराघरांमध्ये समतेची वागणूक व्यवहारातूनच दिसून आली पाहिजे. बरेचदा ही गोष्ट शिकवता येत नाही. ते अंगिकरणच करावे लागते. ते जगण्याचे मूल्य आहे. ते स्वीकारावे लागते. ते स्वीकारले गेले तर समाजात संवेदनशीलता निर्माण होण्यास सुरुवात होईल आणि त्यातून समतेच्या दिशेने आपण वाटचाल करू लागू. आज आपल्याकडे स्त्रियांसंदर्भातील समस्यांवर बोलताना वा आंदोलने करताना नेहमी कायदे करण्याची किंवा कायद्यांमध्ये बदल करण्याची, ते अधिक कठोर करण्याची भाषा केली जाते; परंतु केवळ कायदे करून चालणार नाही.

# विविध क्षेत्रातील महिलांची फिनिक्स गगनभरारी

**आष्टी । प्रतिनिधी**

समाजात काम करत असताना आपलं काम अन् आपण असा मनात निश्चय करून गेल्या अनेक वर्षापासून कुठलीही अपेक्षा न करता आपल्या क्षेत्रात दमदारपणे काम करून फिनिक्स पक्षाप्रमाणे आकाशात गगनभरारी घेऊन आपल्या कर्तत्वचा ठसा उमटविला. एक महिला असून ही आपले एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या आष्टी तालुक्यातील जिगरबाज व कर्तृत्ववान महिलांचा शनिवार दि ९ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी पंचायत समिती येथील सभागृहात सकाळी ११ वाजता आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार देऊन गौरव व सन्मान करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याला उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे. देशभरात विविध क्षेत्रात काम करून महिला नेहमीच पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून 'हम भी किसीसे कम नही' हे अनेक वेळा महिलांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. महिला ही जगात प्रत्येक क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत मग ते क्षेत्र राजकीय असो किंवा शैक्षणिक औद्योगिक असो किवा प्रशासकीय असो शेतीशी निगडीत असो. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. अशाच काही महिलांचा ज्या प्रसिद्धीपासून कोसो दूर राहून पडद्या मागची भूमिका दमदार पणे पार पाडत आहेत. या पुरस्कार सोहळ्याला प्राजक्ताताई सुरेश धस या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून दमयंतीताई भीमराव धोंडे, सविताताई बाळासाहेब आजबे, प्रमोद कुदळे उपविभागीय अधिकारी पाटोदा, बाळदत्त मोरे तहसीलदार आष्टी, शुभदा घोगरे /चव्हाण पोलीस उपाधीक्षक मुंबई, राजेंद्र गर्जे गटविकास अधिकारी आष्टी, डॉ. जयश्री शिंदे तालुका आरोग्य अधिकारी आष्टी, अंजली वाघमारे एकात्मिक बाल विकास अधिकारी आष्टी, सुधाकर यादव गटशिक्षण अधिकारी आष्टी, संतोष खेतमाळस पोलीस निरीक्षक आष्टी, डॉ राहुल टेकाळे अधीक्षक ग्रामीण रुग्णालय, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्याला जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित रहावे



असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष निसार शेख, सचिव जावेद पठाण, कार्याध्यक्ष अक्षय विधाते, संघटक अतुल जवणे, कोषाध्यक्ष आण्णासाहेब साबळे, गहिनीनाथ पाचबैल, समीर शेख, संतोष नागरगोजे, संतोष तांगडे, किशोर निकाळजे, प्रेम पवळ, दादा पवळ,राजु मस्के, संतोष दाणी,बा म पवार, राजेंद्र लाड, शहानवाज पठाण, अमोल जगताप आदी परिश्रम घेत आहेत. जनाबाई आनंदराव बनसोडे (आदर्श माता पुरस्कार), शुभदा घोगरे/चव्हाण पोलीस उपाधीक्षक मुंबई (आदर्श महिला पोलीस अधिकारी पुरस्कार), विजया गंगाधर घुले (केळसांगवी) (उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार), विद्याताई संतोष चव्हाण (आदर्श महिला सामाजिक कार्य पुरस्कार),सीमा दिगंबर वालेवाडीकर/ कांबळे (आदर्श महिला प्राचार्य पुरस्कार), नंदाताई पांडुळे (आदर्श महिला प्रशिक्षक केंद्र संचालिका पुरस्कार), डॉ. प्रियंका सिंघन (आदर्श महिला वैद्यकीय अधिकारी पुरस्कार), श्रीमती संजना रावसाहेब गाढवे धामणगाव (आदर्श महिला सरपंच पुरस्कार), प्रा. डॉ. काझी तनवीर बेगम हाफिजोदिन (आदर्श प्राध्यापिका पुरस्कार), सुनीता श्रीधरराव भोपळे (आदर्श आरोग्य अधिपरिचारिका पुरस्कार), सोनल शिवलाल गायकवाड (आदर्श तलाठी पुरस्कार), ड. सय्यद अतीया ताहेर (आदर्श विधिज्ञ पुरस्कार), दिपाली हरिभाऊ पोकळे (आदर्श कृषी सहाय्यक पुरस्कार), खान यास्मिन (दौलावडगाव,आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार), सुनिता भानुदास थोरवे (आदर्श गटप्रवर्तक पुरस्कार), उषा जगदाळे (उत्कृष्ट विद्युत तंत्रज्ञ पुरस्कार), म्हसोबा महिला शेतकरी गट (आदर्श महिला शेतकरी गट पुरस्कार), निशा आदक (आदर्श ग्रामसेविका पुरस्कार), सुजाता देवराव जाधव (आदर्श शिक्षिका पुरस्कार), वंदना नवनाथ खिलारे (आदर्श महिला वाहनचालक पुरस्कार), पत्रकार गीतांजली लव्हाळे वडवणी (आदर्श महिला पत्रकार पुरस्कार), तनिष्का महिला बचत गट देवळाली (आदर्श महिला बचतगट पुरस्कार) रोहिणी रमाकांत पोतदार (आदर्श महिला दिव्यांग समाजकार्य पुरस्कार) अमूल्या यादव ( उत्कृष्ट नॅशनल खेळाडू पुरस्कार) साईश्री दातीर ( आदर्श कवित्री पुरस्कार) या विविध क्षेत्रातील महिलांचा शनिवारी आष्टी पंचायत समिती सभागृहात महीला दिनानिमित्ताने शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून 'नारी सन्मान २०२४' हा पुरस्कार देऊन आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गौरव करणार आहे.

# वडवणीतील नौकर भरती मार्गदर्शन केंद्राचा लाभ घ्यावा -तांगडे

**वडवणी । प्रतिनिधी**

बहुप्रतिक्षेत असर्णाय़ा महराष्ट्र पोलीस दलाची जाहिरात निघाली असून विविध पदाच्या जवळपास एकूण १६ हजार १९० जागांसाठी पात्र उमेदवरांकडून अर्ज मागण्यासाठी सुरुवात झाली आहे. यामुळे पोलीस भरतीसाठी सराव करर्णाय़ा सुशिक्षित बेकारांची पोलीस होण्याच्या स्वप्नाला या भरतीमुळे बळ मिळाले आहे. तर या भरतीचा फॉर्म भरण्यासाठी उमेदवारांनी वडवणी शहरातील नौकरी मार्गदर्शन केंद्र याठिकाणी संपर्क साधण्याच आव्हान देखील संचालक भैय्यासाहेब तांगडे यांनी केले आहे.देशासह राज्यात लोकसभा निवडणुकीचे वातावरण तापत आहे. तर ऐकीकडे याचं तोंडावर सुशिक्षित बेकारांसाठी नौकरीच्या जागा उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार देखील कटिबध्द असल्याचे दिसून येत असून महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाकडून नुकत्याच सर्व जिल्ह्यातील शिपाई व इतर पदासाठी जहिरात प्रसिध्द केली आहे. यामध्ये पोलीस शिपाई आणि



बँन्डस्मन ९ हजार ३७३, वाहन चालक १ हजार ५७६, एसआरपीएफ जवान ३ हजार ४४१ तर कारागृह पोलीस शिपाई १ हजार ८०० अशा जवळपास एकुण १६ हजार १९० जागेसाठी भरती काढण्यात आली आहे. शिपाई पदासाठी इयत्ता १२ वी तर बँन्डस्मनसाठी इयत्ता १० वी उत्तिर्ण सह १८ वर्ष पुर्ण असर्णाय़ा पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज दि.५ मार्च पासून अर्ज मागण्यात येत आहेत. तर यांचा शेवट दि. ३१ मार्च २०२४ असणार आहे. सदरील पदाच्या भरतीसाठी वयाची मर्यादा हि ३१ मार्च २०२४ रोजीची ग्रह्य धरण्यात येणार आहे. पोलीस शिपाई, बँन्डस्मन आणि कारागृह पोलीस शिपाई यांचे वय १८ ते २८ वर्ष आणि वाहन चालक पदासाठी वय १९ ते २८ वर्ष आणि एसआरपीएफ जवानासाठी वय १८ ते २५ वर्ष असणार आहे. तर वरील सर्व पदासाठी शुल्क चलन आसणार आहे. खुल्या प्रवर्गासाठी ४५० रु. तर मागास प्रवर्गासाठी ३५० रु. आसणर आहेत. या भरतीसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज करवायाचा असल्याने अनेक उमेदवारांना स्व; ताचा अर्ज भरण्यासाठी अडचण निर्माण होते. हि अडचण होऊ नये तसेच यासाठी योग्य ते मार्गदर्शन आणि अचूक भरतीचा ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी वडवणी शहरासह तालुक्यातील उमेदवार नौकरी मार्गदर्शन केंद्र, जुनी कोर्ट बिल्डिंग साळींबा रोड वडवणी श्री. भैय्यासाहेब तांगडे मो. ९७६३२८७५०३ / ७०३८१२८७०६ यांच्याशी भरती विषयी माहिती मार्गदर्शन आणि ऑनलाईन अर्ज करण्यासाठी संपर्क करु शकतात.

## विविध सुविधांचे राज्याचे महिला धोरण जाहीर

**मुंबई । वृत्तसेवा**

मागील तीन वर्षापासून रखडलेले राज्याचे चौथे महिला धोरण आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी महिला आणि बालविकासमंत्री अदिती तटकरे यांनी जाहीर केले. सह्याद्री विश्रामगृहात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यक्रमात हे धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात महिलांसाठी अष्टसूत्री कार्यक्रम आखण्यात आला आहे. या महिला धोरणाचा मसुदा तीनवेळा बदलण्यात आला. आता अष्टसूत्रीच्या माध्यमातून विकासाचा आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती तटकरे यांनी दिली. राज्यातील दुर्लक्षित, दुर्गम आणि पोहोचण्यास कठीण अशा आदिवासी भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेणे. तसेच कर्करोग, मूत्रमार्ग संक्रमण, क्षयरोग, रजोनिवृत्तीच्या समस्या इत्यादींसाठी निदान आणि उपचार सुविधा उपलब्ध, महिलांची संख्या जास्त असलेल्या आस्थापनांच्या ठिकाणी पाळणाघर, आदिवासी मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष, सर्व पोलिस मुख्यालयांमध्ये भरोसा कक्ष स्थापन करण्याची तरतूद या धोरणात करण्यात आली आहे. मुली आणि महिला खेळाडूंसाठी पायाभूत सुविधा प्रशिक्षण, आर्थिक साहाय्य आणि अनुषंगिक पाठबळ देण्यासाठी विशेष क्रीडा धोरण जाहीर करण्यात येणार.

# पत्रकारिता क्षेत्रातील जेष्ठ पत्रकार उत्तम हजारेंना पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांना रयत सामाजिक प्रतिष्ठानचा पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कार जाहीर झाला असून, उद्या दि.१० मार्च



रोजी महाराष्ट्रातील नामवंत चित्रपट कलावंत व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण होणार आहे, या पुरस्कार वितरण सोहळ्यास बीडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रोहिणीताई गणेश माने व प्रतिष्ठानने केले आहे . रयत सामाजिक प्रतिष्ठान हे अल्पावधीतच महाराष्ट्रात नावलौकिक मिळवलेले सामाजिक प्रतिष्ठान आहे. रयत सामाजिक प्रतिष्ठान हे संपूर्ण महाराष्ट्रात समाजकार्यात अग्रेसर असते, रयत च्या माध्यमातून समाजातील तळागाळातील गोर गरीब, कष्टकरी, वंचित घटकांना मदत कार्य तर केलेच जाते परंतु समाजकार्यात सुध्दा रयत प्रतिष्ठानचा सिंहाचा वाटा आहे. रयत म्हणजे सर्व समाज या शब्दाशी प्रेरीत होऊन गणेश माने यांनी रयत नावाचे प्रतिष्ठान असावे आणी या रयत नावाच्या प्रतिष्ठानच्या माध्यमातून गोरगरीब, दिन ,वंचित, शोषितांचे दु:ख दुर करण्यासाठी कार्य घडावे हा मनोदय व्यक्त झाला आणी समाजाप्रती आपलं काही देणं लागतं हा उदात्त हेतु असणार्या युवकांनी रयत प्रतिष्ठान नावाचे हे प्रतिष्ठान उभे केले. आज रयत प्रतिष्ठानच्या महाराष्ट्रभर शाखा असुन जवळपास ५००० च्या वर सभासद आहेत. रयत प्रतिष्ठान च्या माध्यमातून समाजामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षक, नगरसेवक, समाजसेवक, डाँक्टर, सिने कलावंत, नाटय कलावंत, वकिल, उद्योजक, व्यापारी, आर्मी आँफीसर, अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येत असतो. हा पुरस्कार. सोहळा गत ३ वर्षापासून रयत प्रतिष्ठान घेत असुन यंदाचे हे पुरस्कार. सोहळयाचे ४ थे वर्ष आहे. यंदाचा पुरस्कार सोहळा हा गत सालांच्या पुरस्कार सोहळयापेक्षा आगळा वेगळा असणार आहे, कारण १० मार्च दुपारी १२ वाजता डाँ.बाबासाहेब आंबेडकर न्याय भवन नगर रोड बीड येथे होणार्या या पुरस्कार सोहळयासाठी अनेक सिनेकलावंत , सिने अभिनेत्री ,डाँक्टर, आर्मी आँफीसर, शिक्षक , समाजसेवक, पत्रकार , संपादक अशा विविध मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये बाजीराव मस्तानी फेम गायक आणी बीडचे भूमिपुत्र असणारे प्रा.गणेश चंदनशिवे, प्रख्यात सिने कलावंत लक्ष, खाकी,द्रुश्यम या सिनेमातील कलाकार कमलेश सावंत सर, दिग्दर्शक तथा सिने लेखक डाँ. सुधीर निकम सर, जेष्ठ पत्रकार उत्तम हजारे,समाजसेवक तथा नगरसेवक शुभम भैय्या धुत,प्रख्यात कथा लेखक संदीप खुरुद् ,आर्मी आँफीसर दिपक ढोले, आर्मी आँफीसर अनिल काकडे, महिला पत्रकार गितांजली लव्हाळे, आर्मी आँफीसर सुनिल काकडे,दै.लोकांकीत मुंबईचे संपादक संजय पवार, सिनेकलावंत महेंद्र खिल्लारे, सिने अभिनेत्री राणी मस्के, डायरेक्टर प्रविण वडमारे, सिने अभिनेत्री श्वेता भांमरे, शिक्षक वैजीनाथ माने, नगरसेवक विकास जोगदंड, शाहीर विलास बापु सोणवणे ,संगीतशास्त्राचे प्राध्यापक तथा गायक जमदाडे ,उसतोड कामगार हजारै ताई यांच्या सह अनेक मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे, रयत सामाजिक प्रतिष्ठान चा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा रंगतदार होण्याकरिता गणेश माने, सिने अभिनेते महादेव ( म्यडी ) सवाई ,विठ्ठल मूर्केवार सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी,राजेश दादा खर्डे, कैलास दादा पठारे ज्येष्ठ समाजसेवक, लक्ष्मण लटपटे ओबीसी फाउंडेशन महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष,संतोष कुराडे, सामाजिक प्रतिष्ठान जिल्हाध्यक्ष बीड, प्रा. सुरेंद्र कांबळे सर ,ड,रंजीत वाघमारे, उदय देशमुख, गणेश तालखेडकर,प्रमोद रामदासी, ड अविनाश गंडले साहेब,अभिनेते संतोष वारे,अभिनेते तुषार जाधव,समाजसेवक बाजीराव ढाकणे,समाजसेवक गिरी साहेब,मीनाक्षी देवकते या सर्व पदाधिकारी व सभासदांची हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी युध्द पातळीवर तयारी सुरू आहे. उदया होणार्या या रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहयासाठी बीड शहरातील नागरिकांना मोठया संख्येने यावे.

## सुधा मूर्तींची राज्यसभेवर नियुक्ती

मुंबई - भारतीय सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका सुधा मुर्ती यांची आज (दि.८) राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे. त्या राष्ट्रपती नियुक्त सदस्या म्हणून राज्यसभेवर जात



आहेत. या संदर्भातील माहिती स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवरून दिली आहे. पीएम मोदींनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, भारताच्या राष्ट्रपतींनी इन्फोसिस फाऊंडेशनच्या अध्यक्षा सुधा मूर्ती यांचे नामांकन केल्याने मला आनंद होत आहे. राज्यसभेत सामाजिक कार्य, परोपकार आणि शिक्षण यासह विविध क्षेत्रात सुधाजींचे योगदान प्रचंड आणि प्रेरणादायी आहे. राज्यसभेतील त्यांची उपस्थिती ही आमच्या 'नारी शक्ती'चा एक शक्तिशाली पुरावा आहे. जी आपल्या देशाचे भवितव्य घडवण्यात तसेच महिलांच्या सामर्थ्याचे उदाहरण आहे. त्यांना फलदायी संसदीय कार्यकाळासाठी शुभेच्छादेखील पीएम मोदींनी दिल्या आहेत. 'या' सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित इन्फोसिसचे सह-संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांच्या पत्नी सुधा मूर्ती या मूर्ती ट्रस्टच्या अध्यक्ष म्हणून काम करतात. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. वयाच्या ७३ व्या वर्षी, आंतरराष्ट्रीय महिला दिनादिवशीच त्यांचे राज्यसभेवर नामांकन होत आहे. त्यांना २००६ मध्ये पद्मश्री आणि २०२३ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## आदिवासी एकताच्या मूकमोर्चास प्रतिसाद

नगर - आदिवासी एकता परिषदेच्या महिलांनी प्रांताधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढला. प्रारंभी महामानव डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. आदिवासी एकताच्यावतीने कैलास माळी यांच्या नेतृत्वाखाली प्रांताधिकारी किरण सावंत यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी माळी म्हणाले, स्वतंत्र्याच्या ७५ वर्षांमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने आदिवासींच्या विकासाबद्दल ठोस भूमिका न घेतल्याने आदिवासींना मतदान मागण्याचा अधिकार नाही. आदिवासी स्वतःच्या विकासासाठी आजही मोर्चे, आंदोलन करुन आमचा विकास करा, असे म्हणत असेल, तर राजकीय पक्षांनी व आदिवासींना गृहीत धरु नये, असा इशारा त्यांनी दिला. मोर्चातील निवेदनात म्हटले आहे की, जातीचे प्रमाणपत्र स्थानिक चौकशी करुन व ग्रामसभेचा ठराव अंतिम धरुन भिल्ल समाजाला सरसकट द्यावे. स्वतंत्र भिल्ल प्रदेशाची स्थापना करावी. भिल्ल विकास आराखडा मंजूर करावा. सबलीकरण योजनेंतर्गत जमीन वाटप करावे. भामाठाण, टाकळीभान, पढेगाव, कान्हेगाव, गोवर्धन, गळनिंब तर राहुरीतील लाख, सोमय्या फार्म, माहेगाव, खुडसरगाव, सेनवडगाव, जातप, मुसळवाडीसह प्रत्येक गावामध्ये भिल्ल समाज जात प्रमाणपत्र व रेशन कार्ड वाटप शिबीर घेवून, वितरीत करावे, राजूर येथील मोर्चातील मागण्यांची अंमलबजावणी करुन एनबीची प्रकरणे मंजूर करावे. दुधाळ जनावरांचे वितरण करावे.

## पुणे-नाशिक महामार्गावर जमावबंदी

नगर - संगमनेर तालुक्यातील साकुर पठार भागातील विविध गावांना पाण्याच्या पिण्यासाठी पिंपळगाव खांड धरणातून आवर्तन सोडून पाणी शिंदोडीपर्यंत पोहचू द्यावे. या मागणीसाठी १ मार्चपासून जांबुतचे उपसरपंच सुभाष डोंगरे यांनी गावात आमरण उपोषण सुरु केले. दरम्यान, ६ दिवस उलटूनही प्रशासन उपोषणकर्त्यांची दखल न घेतल्याने साकुरकरांनी थेट पुणे- नाशिक राष्ट्रीय महामार्गावर ७ मार्च रोजी सकाळी रस्ता रोको करण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचे कारण देत बुधवारी रात्रीतून पुणे -नाशिक महामार्गासह दुतर्फा २०० मिटरपर्यंत जमाव बंदीचे आदेश लागू करण्यात आले. यामुळे आंदोलनकर्ते आणखी आक्रमक झाले. जांबूत गावात प्रशासनाविरोधात शेकडो शेतकर्यांच्या उपस्थितीत निषेध सभा घेत, आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाचा खरपूस समाचार घेतला. आमरण उपोषणास ६ दिवस उलटूनही प्रशासन पाणी मागणीची दखल घेत नाही. या उपोषणास पाठिंबा देण्यास संगमनेर बाजार समितीचे सभापती तथा साकुरगावचे उपसरपंच शंकर पा. खेमनर व थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजित खेमनर यांनी गुरूवारी पुणे -नाशिक महामार्गावर १९ मैल येथे सकाळी ८ वा. साकुर पठार भागातील नागरिक व शेतकर्यांसह रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. कालवा समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे १ ते १२ फेब्रुवारीच्या दरम्यान पिंपळगाव खांड धरणातून आवर्तन सोडण्यात आले. पिंपळगाव खांड लघु पाटबंधारे तलावाचे लाभक्षेत्र आभाळवाडीपर्यंत असल्याने तेथपर्यंत आवर्तन सोडले, मात्र उपोषणकर्ते सुभाष डोंगरे यांनी शिंदोडीपर्यंत आवर्तन सोडण्याची मागणी केली, परंतु सध्या धरणात शिल्लक पाणीसाठा पुरेसा नाही. आवर्तन सोडल्यास दोन तालुक्यांसह लाभ क्षेत्रासह क्षेत्राबाहेरील गावांमधे संघर्ष निर्माण होऊ शकतो. आवर्तन सोडल्यास अकोले तालुका हद्दीपर्यंत पोहोचेल एवढेच पाणी शिल्लक आहे, असे अकोलेचे जलसंपदा अभियंत्यांनी दिलेल्या अहवालानुसार संगमनेर जलसंपदा अभियंत्यांनी उपोषणकर्ते डोंगरे यांना कळविले आहे.

# महाराष्ट्राची जनता केंद्र सरकारवर संतापली -ठाकरे

**लातूर । वृत्तसेवा**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सध्या लातुर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहेत. यातच लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात ठाकरेंची जाहीर सभा पार पडली. या सभेतून उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्यावर जोरदार टिका केली. यावेळी अमित शाह हे शेपुट घालणारे गृहमंत्री आहेत. हिंमत असेल तर अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मणिपुरला जावं असं आव्हानच ठाकरेंनी यावेळी दिलं. अमित शाह यांनी महाराष्ट्रात येऊन आमच्यावर टिका केली. अमित शाह शेपुट घालून महाराष्ट्रात येत आहेत. परंतु तिकडे मणिपुर पेटलं असता त्यांची त्याठिकाणी जायची हिंमत नाही. असा हा शेपुट घाल्या गृहमंत्री महाराष्ट्रात आला आणि आमच्यावर फणा काढून गेला. माझ्यावर काय बोलले त्यांचा मी नंतरच्या सभेत समाचार घेईनच. परंतु त्यांची या राज्यांमध्ये जायची हिंमत होत नाही, असा हल्लाबोल ठाकरेंनी चढवला. पुढे बोलातांना ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रात मोदींचं नाणं चालूच शकत नाही. हे लक्षात आल्यावर त्यांनी शिवसेना फोडली. बाळासाहेबांचे फोटो लावत आहेत. मी मिंध्यांना भाजपलाही आव्हान देतो. स्वत: च्या वडिलांचे फोटो लावून जिंका ना ? स्वत:च्या वडिलांवर आत्मविश्वास नाही का ? माझे वडिल का चोरता ? असा सवालही त्यांनी केलाय. संपुर्ण महाराष्ट्र आता चवताळलेला आहे, तो आता वाट बघतोय निवडणुका व्हायची. आता भाजपला संपवून गाडून, मुठमाती देऊन शिवसेना पुढे जाईल. पण शिवसेना संपणार नाही. ट्रिपल इंजिनच्या सरकारला भ्रष्टाचाराची चाकं लावलेली आहेत. असे म्हणत मोदीजींनी मेरा परिवार म्हटलंय. पण त्या परिवाराची जबाबदारी कोण घेणार ? असासही सवाल केला.



# मतदार संघात पाच वर्षात भरीव विकास कामे -आ.मोनिका राजळे

**पाथर्डी । वृत्तसेवा**

निवडणुकांच्या चर्चा सुरू झाल्याने आता अनेक मंडळी फिरायला येत असून, त्यांच्या भेटीगाठी सुरू आहेत. मात्र, आपण पाच वर्षांत भरीव विकासकामे केली असून, यावरच आपल्याला प्रचार करायचा आहे. या लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवाराला मागील वर्षी पेक्षाही जादा मताधिक्य तालुक्यातून द्यायचे आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या मतांमध्ये वाढ कशी होईल, यासाठी कार्यकर्त्यांनी दिलेली जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी केले. धामणगांव, कुरणतांडा, कोळसांगवी, काटेवाडी, खरवंडी,



टाकळीमानुर, मंचरवाडी, अंबिकानगर, चुंभळी, दातीरवाडी, अकोला, मोहटा, हंडाळवाडी आदी ठिकाणी मुख्यमंत्री ग्रामसडक, तांडा सुधार, लेखाशीर्ष, अर्थसंकल्प, राज्यस्तरीय दलितवस्ती योजना व आमदार स्थानिक विकास निधी योजनेतून विविध विकासकामे, विद्युत पुरवठा करणे, नवीन विद्युत रोहित्र बसविणे, ग्रामपंचायत कार्यालय, अशा सुमारे अकरा कोटींच्या कामांचे गुरुवारी (दि.७) आमदार राजळे यांच्या हस्ते लोकार्पण व प्रारंभ करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष डॉ मृत्युंजय गर्जे, माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल राजळे, नारायण पालवे, मधुकर देशमुख, रामकिसन काकडे, रवी आरोळे, पुरुषोत्तम आठरे, पप्पू काळे, शिवाजी काकडे, भाऊसाहेब मरकड, सुनील माघाडे, अशोक कराळे, नारायण काकडे, बाबासाहेब किलबिले, दिगंबर भवार आदी उपस्थित होते. आमदार राजळे म्हणाल्या, केंद्रात आणि राज्यात एक सरकार असल्यामुळे एवढा निधी मतदारसंघात मिळत आहे. पाथर्डी आणि शेवगाव या दोन्ही तालुक्यांना समान न्याय देण्याच्या हिशेबाने आलेल्या विकास निधीचे समान वाटप केले जात आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून दोन्ही तालुक्यांसाठी एकत्रितपणे सुमारे ३५ किलोमीटरच्या रस्त्यांसाठी आगामी काळात निधी उपलब्ध होणार आहे. मतदारसंघात ७१ किलोमीटरचे रस्ते मंजूर झाले आहेत. यातील काही कामे झाली असून, काही बाकी आहेत. मतदारसंघातील प्रत्येक गावात कोणता ना कोणता विकास निधी उपलब्ध करून दिला आहे.

## राज्यातील तापमानात होणार वाढ

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यात आता थंडी हळूहळू गायब होत चालली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार येणाऱ्या दिवसांत राज्यातील तापमानात वाढ होताना दिसणार आहे. मागील काही आठवड्यात अवकाळी पावसाचा फटका राज्यातील अनेक भागांना बसला. विशेषत: मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात या पावसामुळे सर्वात जास्त नुकसान झाले. वेस्टर्न डिस्टबर्न्समुळे देशासह राज्याच्या हवामानात मोठा बदल झाल्याचं दिसून येत आहे. याचा परिणाम राज्यातील हवामानात बदल होत असून आता रात्री थंडी, दिवसा उन्हाचे चटके बसायला सुरूवात झाली आहे. पुणे हवामान विभागाच्या माहितीनुसार, राज्यात पुढील २४ तासांत महाराष्ट्रात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. पुढील ४-५ दिवसांत महाराष्ट्रात किमान आणि कमाल तापमानात २-३ अंश सेल्सिअसने हळूहळू वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील २४ तासांसाठी मुंबई शहर आणि उपनगरांसाठी स्थानिक अंदाज वर्तविण्यात आला आहे. शहर आणि उपनगरात प्रामुख्याने आकाश निरभ्र राहील.

# राज्यातील पाचवी व आठवीची वार्षिक परिक्षा लवकरच होणार

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यातील राज्य मंडळाचा अभ्यासक्रम असणाऱ्या सर्व मान्यताप्राप्त शाळा, सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता ५ वी आणि ८ वी साठी ३ एप्रिल रोजी वार्षिक परीक्षा व नियतकालिक मूल्यांकन चाचणी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या कार्यालयाने दिली आहे. इयत्ता ५ वी व ८ वीची वार्षिक परीक्षा ही द्वितीय सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारीत असणार आहे. या वार्षिक परीक्षांसाठी इयत्ता ५ वी ला प्रथम भाषा, द्वितीय भाषा, तृतीय भाषा, गणित, व परिसर अभ्यास हे विषय असतील तर इयत्ता ८ वी ला प्रथम भाषा, द्वितीय भाषा, तृतीय भाषा, गणित, विज्ञान व सामाजिक शास्त्र हे विषय असतील. तसेच इयत्ता ५ वी आणि ८ वी साठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन योजनेतील संकलित मूल्यमापन २ म्हणजेच वार्षिक परीक्षा असणार आहे. या परीक्षेकरिता प्रत्येक शाळांनी शाळास्तरावर प्रश्नपत्रिका तयार करून परीक्षा घेण्यात यावी. शाळांनी प्रश्नपत्रिका तयार करताना राज्य शैक्षणिक



संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र यांनी त्यांच्या ाार.रल.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध नमुना प्रश्नपत्रिकेचा उपयोग करून प्रश्नपत्रिका तयार कराव्यात. इयत्ता पाचवी व आठवीच्या वार्षिक परीक्षेत विद्यार्थी ज्या विषयात उत्तीर्ण होऊ शकणार नाहीत त्यासाठी त्यांच्या शाळेमार्फत त्या विषयासाठी अतिरिक्त पूरक मार्गदर्शन प्रदान करून वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्याच्या आत पुनर्परीक्षा देण्याची संधी देण्यात येईल. पुनर्परीक्षाचे आयोजनदेखील शासन निर्णयाप्रमाणे संबंधित शाळांनी करावयाचे आहे. पुनर्परीक्षा घेताना शाळांनी कोणती दक्षता घ्यावयाची याबाबतचे निर्देश संबधित शासन निर्णयात दिलेले आहेत. नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पीएटी) शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ पासून राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खाजगी अनुदानित शाळांमधील इयत्ता ३ री ते ८ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा, गणित व तृतीय भाषा (एकूण १० माध्यम) करिता तीन नियतकालिक मूल्यांकन (पीएटी) चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यापैकी आतापर्यंत पायाभूत चाचणी व संकलित मूल्यमापन १ चे आयोजन करण्यात आले असून संकलित मूल्यमापन २ चे आयोजन २ ते ४ एप्रिल या कालावधीमध्ये राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खाजगी अनुदानित शाळांमध्ये एकाच वेळी करण्यात येणार आहे. इयत्ता ३ री, ४ थी, ६ वी, ७ वी करिता प्रथम भाषा, गणित व तृतीय भाषा या तीन विषयांकरिता नियतकालीक मुल्यांकन चाचणी हीच संकलित मूल्यमापन २ असेल त्यामुळे या विषयांसाठी स्वतंत्रपणे संकलित मूल्यमापन २ घेण्यात येणार नाही व उर्वरित विषयांचे संकलित मूल्यमापन २ शाळांनी त्यांच्या स्तरावर प्रश्नपत्रिका विकसित करून घ्यावयाच्या आहे. इयत्ता ५ वी व ८ वी साठी मात्र नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पीएटी) ही संकलित मूल्यमापन २ असणार नाही. या दोन इयत्तांसाठी वार्षिक परीक्षा ही स्वतंत्रपणे घेण्यात येईल. त्यामुळे शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळांनी २, ते ४ एप्रिल या कालावधीत नियतकालिक मूल्यांकन चाचणीचे आयोजन निश्चित केले असल्यामुळे या चाचणी नंतरच वार्षिक परीक्षेचे आयोजन शाळांनी करावे. सर्व शाळांनी सूचनांप्रमाणे आपल्या स्तरावर इयत्ता ५ वी व ८ वी च्या वार्षिक परीक्षा शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे अंमलबजावणी करून यशस्वीपणे परीक्षा पार पाडाव्यात, यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या उपसंचालक (समन्वय) डॉ. कमलादेवी आवटे यांनी केले आहे.

## नगर जिल्ह्यात राजकीय भूकंप

**नगर । वृत्तसेवा**

जिल्ह्यात राजकीय भूकंप झाला आहे नेवासा तालुक्यात सोनई भाजपचे जिल्हा परिषद सदस्य व कायम निमंत्रित सदस्य दत्तत्रय काळे यांनी भाजपच्या सर्व पदाचा त्याग करत भेंडा बुद्रुक येथे आमदार गडाख गटात जाहीर प्रवेश केला. नेवासे तालुक्यात भाजपची तोफ समजणाऱ्या काळे यांनी गडाख गटात प्रवेश केल्याने माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे व भाजप जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे यांना धक्का बसला आहे. काळे यांच्यासह भेंडा बुद्रुकचे उपसरपंच पंढरीनाथ फुलारी, देवगावचे सरपंच विष्णू गायकवाड, देवगावचे ग्रामपंचायत सदस्य देवेंद्र काळे, रवींद्र गायकवाड यांनी गडाख गटात प्रवेश केला. राज्यात तसेच देशात अनेक पुढारी भाजपमध्ये जात असताना नेवासे तालुक्यात मात्र अनेकांनी भाजप सोडली आहे. खुपटी, शिंगवे तुकाई, नेवासे बुद्रुक, भानासहिवरे, शनिशिंगणापूर, कुक्काणेसह अनेक भाजपचे निष्ठावंत गडाख गटात सहभागी झाले आहेत. एकाच वेळी भेंडा गटाचे जिल्हा परिषद सदस्य, देवगावचे सरपंच व रांजणगावदेवीचे सरपंच, भेंडा बुद्रुकचे उपसरपंच यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिल्याने तालुक्यात भाजपला खिंडार पडले आहे. जि. प. सदस्य काळे यांचा भेंडा, कुक्काणे, चांदा गटात मोठा लोकसंपर्क आहे. माजी आमदार मुरकुटे यांच्या गटातून ते जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले.

# जालन्यात नामांकित स्टील कंपनीत आयकर विभागाची धाड

**जालना । वृत्तसेवा**

येथे एका नामांकित स्टील कंपनीवर आयकर विभागाकडून धाड टाकण्यात आली आहे. कर चूकवेगिरीच्या संशयावरून मुंबईतील आयकर विभागाच्या पथकाकडून कालपासून हे धाडसत्र सुरू असल्याची माहिती मिळत आहे. यात आयकर विभागाकडून कंपनीतील काही महत्वाची कागदपत्रे आणि संगणकातील डेटा ताब्यात घेतल्याची देखील माहिती समोर येत आहे. संबंधित कंपनीमध्ये जमा खर्चाचा संशयास्पद व्यवहार आढळल्याची देखील माहिती आहे. जालना येथे एका नामांकित स्टील कंपनीत आयकर विभागाच्या तब्बल २०० जणांच्या पथकाकडून गुरुवारी पहाटे ६ वाजेदरम्यान अचानक धाड टाकण्यात आली. विशेष म्हणजे या कंपनीसह संचालक व एका उच्चपदस्थ कर्मचाऱ्यांच्या घरांवर एकाच वेळी छापे टाकण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कंपनीच्या जमा- खर्चाच्या व्यवहारात काही संशयास्पद बाबी आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. तर, आतापर्यंत कारवाईत नेमकं काय काय मिळून आले याची अधिकृत कोणतेही माहिती समोर आलेली नाही. जालना शहरात अनेक स्टील कंपन्या आहेत. काही नामांकित कंपन्यांमधील स्टील देशभरात विक्रीसाठी जाते. मात्र, अनेकदा कर चुकवल्या प्रकरणी किंवा व्यवहारात संशयास्पद बाबी आढळून आल्यास वेगवेगळ्या विभागाकडून कारवाया केल्या जातात. अशीच कारवाई गुरुवारी करण्यात आली आहे. जालना एमआयडीसीमध्ये असलेल्या या स्टील कंपनीत गुरुवारी सकाळी ६ वाजता अचानक आयकर विभागाचं पथक पोहचलं. फक्त कंपनीच नाही तर कंपनीच्या संचालकासह एका उच्चपदस्थ कर्मचाऱ्यांच्या घरांवर देखील धाड टाकण्यात आली आहे. कालपासून सुरु असलेली चौकशी अजूनही सुरूच असल्याची माहिती मिळत आहे. २०० जणांचे आयकर विभागाचे पथक गुरुवारी जालन्यात दाखल झाले. मुंबईतील हे पथक असल्याचे बोलले जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार संबंधित स्टील कंपनीच्या व्यवहारात संशयास्पद बाबी आढळून आल्याने आयकर विभागाने ही कारवाई केली आहे. विशेष म्हणजे, या कंपनीतील मालाच्या खरेदी-विक्री आणि इतर आर्थिक व्यवहार पाहणाऱ्या एकाला जालना तालुक्यातील दरेगावातून राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आल्याची देखील माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे यापूर्वी देखील जालना येथील स्टील कंपन्यांवर जीएसटी विभागासह आयकर विभागाने कारवाया केल्या आहेत.

## मोक्कातील आरोपीच्या आवळल्या मुसक्या

कडा – मोक्का अंतर्गत कारवाई झालेला आरोपी दोन वर्षापासून सातारा पोलिसांना गुंगारा देत होता. या आरोपीस आष्टी पोलिसांनी पाच किलोमीटर पाठलाग करत मुसक्या आवळल्याची कारवाई शुक्रवारी सकाळी करण्यात आली. धर्मेंद्र ननश्या काळे (३० रा. चिखली) असे आरोपीचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील चिखली येथील धर्मेंद्र ननश्या काळे याच्यावर दोन वर्षापूर्वी सातारा येथील वडूज पोलिस ठाणे हद्दीत संघटितपणे दरोडा, दरोड्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी २०२२ मध्ये मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. तेव्हापासून तो स्थानिक पोलिसांना गुंगारा देत पळत होता. दरम्यान, आष्टी पोलिसांना धर्मेंद्र काळे हा चिखली येथील घरी आल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी तब्बल पाच किलोमीटर पाठलाग करत त्याच्या मुसक्या आवळल्या.

## होमिओपॅथिक महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

बीड – येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मंझेरी हवेली येथे दि.११ ते १७ मार्च २०२४ या कालावधीत निवाशी शिबीर आयोजीत केल्याची माहिती कार्यक्रम अधिकारी डॉ.गणेश पांगारकर यांनी दिली. मंझेरी येथील संत ज्ञानेश्वर मंदिराच्या परिसरातील सभामंडपात हे शिबीर आयोजीत केले असून याच ठिकाणी एन.एस.एस. चे विद्यार्थी राहतील. १०० विद्यार्थी, विद्यार्थिनी यामध्ये सहभाग घेणार असून या कालावधीत विविध वक्त्यांची भाषणे, आरोग्य शिबीर, समाजोपयोगी शासकिय व राष्ट्रीय कार्यक्रम आयोजीत करणार येणार असून आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकिय महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरूण भस्मे, प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज, सरपंच अंबादास गुजर यांच्या सहकार्याने हे शिबीर संपन्न होत आहे.

## विषबाधा झाल्याने अनेकांची प्रकृती बिघडली

गेवराई – एकादशीच्या दिवशी (गुरूवार) दि.७ मार्च रोजी फराळातून शहरातील काही भागात अनेकांची प्रकृती बिघडली. त्यांना विषबाधा झाल्याचे निकटवर्तीयांचे म्हणणे आहे. या बाधितांना गेवराई येथील सरकारी रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. दरम्यान परळी मतदारसंघातील निरपणा या गावातील काही जणांना अन्नातून विषबाधा झाली. प्राथमिक माहितीनुसार, बाधित रूग्ण ३ च्या आसपास आहेत. यानंतर त्यांना मळमळ, उलट्या, पोटदुखी, हात, पाय दुखणे, डोकेदुखी असा त्रास सुरू झाला. यानंतर त्यांना शहरातील सरकारी रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले. दिवसेंदिवस होत असलेल्या या घटनेमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. विष बाधा होणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळणे असाच प्रकार सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अन्नपुरवठा भेसळ विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गेवराई शहरातील सर्व किराणा दुकानाकडे लक्ष घालून होत असलेली विक्री तात्काळ थांबवावी अशी मागणी होत आहे.

## तरुणाला केली बेदम मारहाण

केज – सोशल मिडियात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्टेट्स शेयर केल्याचे रागातून दोघांनी एका तरूणास बेदम मारहाण केल्याची घटना तालुक्यातील लव्हुरी या गावी गुरुवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरूवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास लव्हुरी येथील एका हॉटेलसमोर बसलेल्या गणेश नागनाथ चाळक यास गावातीलच राहुल सर्जेराव चाळक आणि कैलास सुरेश चाळक या दोघांनी, तु तुझ्या सोशल मीडीयावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचे स्टेटस का ठेवलेस? असा जाब विचारला. यारून त्यांच्यात वाद झाला. यातूनच कैलासने लोखंडी रॉडने गणेशच्या हातापायावर मारहाण केली. तर राहुलने गणेशला जिवे मारण्याची धमकी देत लाथाबुक्याने मारहाण केली. यावेळी अमोल इंदरराव चाळक, नागनाथ हरिभाऊ चाळक यांनी मध्यस्थी केल्याने पुढील अनर्थ टळला.




# खडतर परिश्रम केल्याशिवाय कोणत्याही क्षेत्रात नावलौकिक होत नाही –जिल्हाधिकारी दीपा मुंडे



**बीड । प्रतिनिधी**

**आपणही जिल्हाधिकारी व्हावं असं प्रत्येकाला वाटतं मात्र त्या दृष्टिकोनातून खडतर परिश्रम करण्याची तयारी आणि घेतलेल्या निर्णयावर ठाम जो राहू शकतो तोच यशस्वी होऊ शकतो.यासाठी प्रत्येकाने आपला बुद्धीचा मूल्यांकन किती आहे हे सातत्याने तपासलं पाहिजे. तरच आयुष्यामध्ये यशस्वी होता येत. आपलं डोकं नेमकं कुठं चालतं हे जर कळलं आणि त्यानुसार त्या क्षेत्रातच पुढे प्रगती केली परिश्रम केले तरच त्यामध्ये तो पुढे यशस्वी होऊ शकतो असे मत व्यक्त करून मी जिल्हाधिकारी कसे झाले याचा उलगडा बीडच्या दबंग लोकप्रिय जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी बीड येथील स्त्री रत्न पुरस्कार सोहळ्याप्रसंगी आपल्या अमूल्य अशा मार्गदर्शनातून व्यक्त केला.**

बीड येथील स.मा.गर्गे भवन येथे पत्रकार संघ, दैनिक सूर्योदय, दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पूर्वसंध्येला दिनांक ७ मार्च २०२४ रोजी विविध क्षेत्रातील यशस्वी रणरागिणींचे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या शुभहस्ते सायंकाळी ४ वाजता सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पगुच्छ,शाल, श्रीफळ,पेन भेट देऊन गौरवण्यात आले.यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा परिषदेच्या पहिल्या महिला मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील,बीडच्या जिल्हा माहिती कार्यालयातील पहिल्या महिला प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर कांबळे, बीडच्या पहिल्या पोक्सोच्या विशेष सरकारी वकील अँड मंजुषा दराडे मुंडे त्याचबरोबर ब्रह्मकुमारी प्रज्ञाबहण दिदीजी, सौ स्मिता चंद्रकांत नवले, सौ संध्या बारगजे, डॉक्टर उर्मिला घोडके दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर दैनिक सूर्योदयचे संपादक गंगाधर नाना काळकुटे युवा नेते चंद्रकांत नवले,दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी प्रसिद्ध मुळव्याध तज्ञ डॉक्टर रमेश घोडके समाज रत्न गोवर्धन दराडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांची विशेष उपस्थिती लाभली. याप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रचंड धावपळ असताना सुद्धा या कार्यक्रमातील महिलांचा उत्साह पाहून पूर्णवेळ थांबून उपस्थित महिलांना विस्तृत मार्गदर्शन केले.त्या म्हणाल्या आपण आपल्या मुलांना डॉक्टर हो, इंजिनियर हो कलेक्टर हो असे म्हणतो, पण त्यासाठी त्याला आवश्यक असणारे पोषक वातावरण निर्माण करतो का ? यावर पालकांनी विचार करणे गरजेचे आहे.मुलांच्या डोक्यात किती बसते किती वेळा वाचल्यावर,किती वेळा लिहिल्यावर, किती वेळा घोकंपट्टी केल्यावर आपल्या मेमरी मध्ये एखादी गोष्ट पक्की होते. याचा आपणच अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याशिवाय आपल्याला पुढे यशस्वी मार्गावर जाता येणार नाही.पालकांनी देखील आपल्या पाल्याचा बुद्धांक किती आहे ? हे तपासले पाहिजे. उगीच आपल्या इच्छा त्याच्या मनावर बुद्धीवर लादू नये.तरच तो आपल्याला आवडेल त्या क्षेत्रात प्रगती करू शकतो. मुलांना फक्त प्रामाणिकपणे मेहनत करायची आहे ती त्यांनी करावी आणि यशस्वी व्हावे असा मौलिक सल्ला देत त्या म्हणाल्या प्रत्येक कुटुंबाच्या प्रगतीमध्ये आईचा मोठा वाटा असतो ती संसार मुले आणि जबाबदारी अगदी प्रामाणिकपणे पार पाडते त्यामुळेच जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मी माझ्या माता–भगिनींना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देते.आज या ठिकाणी विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचा स्त्री रत्न पुरस्कार देऊन महिलांना एक नवी ऊर्जा देण्यासाठी पत्रकार संघ, दैनिक सूर्योदय, दैनिक राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने राबवलेला हा एक आदर्शवत स्तुत्य उपक्रम आहे.यामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासामध्ये महिलांचे योगदान निश्चित मोठे असेल असे मत व्यक्त करून जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

### मी कलेक्टर कशी झाले –दीपा मुंडे

माझे वडील खूप शिस्तीचे आणि कडक होते. त्यांच्या गाडीचा आवाज आला तरी देखील आम्ही रूम मध्ये बसून पुस्तक वाचत बसायचो. मी आठवी पर्यंत डॉक्टर होण्याचे ध्येय समोर ठेवले होते परंतु नववी मध्ये असताना आमच्या घराशेजारी नवीन जिल्हाधिकारी राहिला आले. त्यांची जेव्हा लाल दिव्याची गाडी यायची तेव्हा आमचे वडील सुद्धा त्यांच्यापुढे उभे राहायचे.त्यामुळे मला आपण सुद्धा कलेक्टर व्हावे असे वाटले. मनाशी निश्चय केला आणि खडतर परिश्रमातून मी जिल्हाधिकारी झाले.आपला पूर्व इतिहास त्यांनी मोजक्या आणि अनोख्या शब्दात बीडकरांच्या समोर पहिल्यांदाच व्यक्त करत मी कलेक्टर कसे झाले यावर विस्तृत मार्गदर्शन केले.

### जिल्हाधिकाऱ्यांचा देखील केला प्रशासकीय स्त्रीरत्न पुरस्काराने सन्मान

बीडच्या दबंग तथा लोकप्रिय जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे या प्रमुख अतिथी असल्या तरी देखील आयोजकांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, ज्येष्ठ संपादक संतोष मानूरकर, संपादक तथा छावा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गंगाधर नाना काळकुटे, वैभव स्वामी, शेख आयेशा आदींनी प्रशासकीय स्त्री रत्न पुरस्कार देवून यथोचित सन्मानित केले. यासह बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, बीडच्या जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर यांना प्रशासकीय रत्न या पुरस्काराने तर पोक्सोच्या पहिल्या विशेष सरकारी वकील अँड मंजुषा दराडे यांना विधी रत्न या पुरस्काराने आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी प्रज्ञादीदी बहनजी यांना राजयोगीनी रत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच सेवा रत्न या पुरस्काराने इन्फनंट इंडियाच्या सौ संध्या बारगजे, वृद्धाश्रम चालवणाऱ्या मनीषा पवार यांना सन्मानित करण्यात आले. मुळव्याध तज्ञ डॉक्टर उर्मिला घोडके यांना आरोग्यरत्न तर अध्यात्म रत्न म्हणून सौ स्मिता चंद्रकांत नवले, कलारत्न म्हणून शैलाताई मुसळे, शिक्षक रत्न म्हणून वैशाली अशोक पडोळे,मनीषा मुंडे यांना तर समाज रत्न म्हणून सौ रंजना गोवर्धन दराडे, अनुराधा रसाळ,पहिल्या महिला एसटी चालक मंजू अरुणराव रांजणकर, पहिली पान टपरी चालक अमृता शिंदे यांना सन्मानित करण्यात आले. पत्रकारांमध्ये ज्येष्ठ संपादिका प्रतिभा गणोरकर, सविता कुलकर्णी, जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी बेबीसरोज अंबिलवादे लोळगे, लता करांडे यांना माहिती रत्न तर सेवा रत्न म्हणून नयना भाकरे, सविता जैन, आदींना स्त्रीरत्न पुरस्कार देऊन विशेष सन्मानित करण्यात आले.

# तरुणांनी आधुनिक शेतीकडे वळावे –धस

**आष्टी । प्रतिनिधी**

आजची तरुण पिढी ही नोकरीच्या मागे धावण्यात खूप मोठा वेळ वाया घालत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या शेतीविषयक विविध वेगवेगळ्या योजना आहेत. याच योजनांचा लाभ घेऊन शेती केली तर नोकरीपेक्षाही मोठा फायदा तरुणांना होईल. त्यामुळे तरुणांनी नोकरीच्या मागे न धावता आधुनिक शेती करून आपला उन्नतीचा मार्ग शोधावा असे आवाहन युवा नेते जयदत्त धस यांनी केले. ते आष्टी तालुक्यातील कडा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आष्टी मतदार संघातील चार जणांना शासनाने कृषी रत्न पुरस्कार जाहीर केले आहेत त्यानिमित्त बाजार समितीने ठेवलेल्या सत्कार सोहळ्यामध्ये बोलत होते. पुढे बोलताना जयदत्त धस म्हणाले की, आष्टी तालुका हा कायम दुष्काळी तालुका आहे. तरीही या भागातील शेतकऱ्यांनी विविध प्रकारच्या फळबागा मोठ्या प्रमाणात लावल्या आहेत त्यासाठी सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून पंचायत समितीकडून शेततळे व सिंचन विहिरी दिल्यामुळे आष्टी तालुक्यामध्ये फळबागा



मोठ्या प्रमाणात आहेत. दुष्काळी तालुक्यातही मोठ्या प्रमाणावर फळबागा झाल्याने शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळू लागला आहे .आता येत्या काही दिवसांमध्ये तालुक्याची जीवनवाहिनी ठरणाऱ्या खुंटेफळ साठवण तलावाचे काम सुरू होणार आहे या तलावामध्ये सात टीएमसी पाणी येणार असल्याने तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन आष्टी तालुक्यातील शेतकरी हा सुखावणार आहे. या तलावाच्या कामासाठी सुरेश आण्णा धस यांनी मोठे कष्ट घेतले असून राज्य सरकारकडे सतत पाठपुरावा करून तलावाच्या कामाचा प्रश्न मार्गी लावला आहे. आष्टी तालुक्यातील दुष्काळी भागातील चार जणांना महाराष्ट्र शासनाने कृषी सेवा रत्न पुरस्कार दिल्याचा अभिमान असून पुरस्कारार्थींचे सर्वांचे काम इतरांनी प्रेरणा घेण्यासारखे असल्याचे जयदत्त धस यांनी सांगितले. याशिवाय केळसांगवी येथील विजया घुले या महिला असूनही त्यांनी सफरचंद ड्रॅगन फ्रुट व खजुराची शेती करून अफलातून उत्पन्न घेतले असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी सत्कारला उत्तर देताना तत्कालीन तालुका कृषी अधिकारी राजू सुपेकर म्हणाले की, कडा कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारे आहे. सुरेश धस यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे. शेतकऱ्यांनी या पुढील काळात सुधारित बियाणे वापरून व सुधारित शेती केली तरच ती परवडू शकते. शेतकऱ्यांनी सुधारित वाण, अत्याधुनिक अवजारे, खते बी बियाणे याचे नियोजन करणे गरजेचे आहे. मी पश्चिम महाराष्ट्रातील असल्याने सुरुवातीला मराठवाड्यातील आष्टी मध्ये नोकरी करण्यासाठी मन धासावत नव्हते मात्र आष्टीमध्ये नोकरी करण्याचे आव्हान स्वीकारून ते यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे समाधान वाटत असल्याचेही सुपेकर यांनी सांगितले .

## बचत गटातील महिलांचा सन्मान सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर येथील् अहिल्याबाई होळकर सभागृह नवीन भाजी मंडई बीड येथे लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य च्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त बचत गटातील महिलांचा सन्मान सोहळा संघाचे सं. अ.भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष माणिक वाघमारे, अध्यक्ष नारी शक्ति शहर स्तर संघ,शहर, पत्रकार देवा कुलकर्णी, प्रभाकर राख शिक्षक यांच्या उपस्तितीत संपन्न झाले. जागतिक महिला दिनानिमित्त सर्व जगामध्ये मोट्या उत्साहत साजरा केला जात आहे.लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य ने अगदी सध्या पण आनंदाच्या क्षणांना मध्ये साजरा करण्यात आला.यावेळी महिला बचत गटातीतल महिला मोठ्या संख्येने उपास्तीत होते.

## ट्रेंड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया महाराष्ट्र शाखेच्या निवडणुकीत राजाभाऊ राठोड भरघोस मतांनी विजयी

**माजलगाव । प्रतिनिधी**

ट्रेंड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया महाराष्ट्र शाखेच्या निवडणुकीसाठी काल मतदान झाले.यामधे तालखेड (कुरण तांडा ) येथील राजाभाऊ पापालाल राठोड हे भरघोस मतांनी विजयी होऊन अध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. ट्रेंड नर्सेस असोसिएशन ही आशिया खंडातील सर्वात जुनी असोसिएशन आहे. १९०८ मध्ये असोसिएशनची स्थापना झाली. दर चार वर्षांनी असोसिएशनची निवडणूक होते.आत्तापर्यंत महाराष्ट्रात अध्यक्ष हे बिनविरोध निवडून येत होते.पहिल्यांदाच म्हणजे ११६ वर्षानंतर अध्यक्षपदासाठी विरोधक म्हणून राजाभाऊ राठोड उभे राहिले होते. दिनांक ७ मार्च रोजी महाराष्ट्र शाखेची निवडणूक झाली.यामध्ये अध्यक्षपदी बहुमताने निवडून आले आहेत. त्यामुळे संपूर्ण नर्सेस आनंद साजरा करत आहे. मराठवाड्यातील एका छोट्याशा तांड्यातील व्यक्तीने या एवढ्या मोठ्या असोसिएशन मध्ये अध्यक्ष पद भूषवणे ही मराठवाड्यासाठी गौरवाची बाब आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील सुपुत्र आज महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षपदावरती विराजमान झाला.






Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com